प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय
जिल्हाधिकारी कार्यालया जवळ,
कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांचे कार्यालयातील कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील.

१.कार्यालयाचे नांव :- प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय
पत्ता :- प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालया जवळ,
कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२.

कार्यालय प्रमुख :- प्रादेशिक परिवहन अधिकारी

शासकीय विभागाचे नांव :- मोटार वाहन विभाग

मंत्रालयातील कोणत्या खात्याच्या अधिनस्त :- गृह विभाग (परिवहन)

कार्यक्षेत्र :- अमरावती विभाग

२.विभाग प्रमुख :- मा.परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
पत्ता :- परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय ईमारत ३रा व ४था माळा,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्याना जवळ, शासकीय वसाहत,बांद्रा (पुर्व)
मुंबई — ५१.
३.या सोबत जोडण्यात येत आहे.

४ व ५.

कार्यानुरुप :- मोटार वाहन कायदा १९८८, मुंबई मोटार वाहन कर कायदा १९५८, केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९,महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९, मुंबई मोटार वाहन प्रवाशी कर कायदा १९५८ आणि त्या अंतर्गत असलेल्या नियमांची अंमलबजावणी.

विशिष्ठ कार्ये :- मोटार वाहन कायदा १९८८, मुंबई मोटार वाहन कर कायदा १९५८, मुंबई मोटार वाहन प्रवाशी कर कायदा १९५८ आणि त्या अंतर्गत असलेल्या नियमांची अंमलबजावणी.

विभागाचे ध्येय/ धोरण :- १. रस्ता सुरक्षा
२. महसुल वसुली
३. वाहतुक विकास ४. वाहन / अनुज्ञप्तीचे अभिलेख ठेवणे इ.

६. कार्यालयामध्ये उपलब्ध सेवा :- दुरध्वनी, फॅक्स,फ्रँकींग मशीन,
ई-मेल :- mh27@mahatranscom.in

कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक :- ०७२१- २६६२०३२, फॅक्स ०७२१- २६६२६०६,
कार्यालयीन वेळ :- सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.४५ पर्यंत
साप्ताहीक सुटी :- प्रत्येक रविवार, दुसरा व चौथा शनिवार
कर व फी स्विकारण्याच्या वेळा – सकाळी १०.०० ते दु. २.३० वाजे पर्यंत

७. मोटार वाहन अधिनियम, १९८८ व त्या अनुषंगाने अंमलबजावणीसाठी खालील कामे केली जातात

१. मोटार वाहन चालविण्यासाठी अनुज्ञप्ती (लायसन्स) देणे व त्याचे नुतनीकरण करणे
२. सार्वजनिक वाहन (जसे- टॅक्सी, रिक्षा) चालविणा-या चालकांना बॅज देणे
३. आंतरराष्ट्रीय वाहन चालकाचा परवाना देणे
४. मोटार वाहनांची नोंदणी व तात्पुरती नोंदणी करणे
५. इतर राज्यात नोंदणी झालेले वाहन या राज्यात आणल्यास व कायम स्वरुपात ठेवल्यास अशा वाहनांना ,महाराष्ट्र राज्याचा नोंदणी क्रमांक देणे
६. परिवहन (ट्रान्सपोर्ट)वाहनांना योग्यता प्रमाणपत्र देणे
७. नोंदणीस १५ वर्षे पुर्ण झालेल्या खाजगी मोटार वाहनांची तपासणी करणे व नोंदणीचे नुतनीकरण करणे
८. वाहनांना विविध प्रकारचे परवाने देणे, वाहनांच्या वाहतुकीवर त्याव्दारे नियंत्रण ठेवणे
९. मोटार वाहन कायदा व करविषयक कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करणा-या वाहन मालक / चालकांविरुध्द नियमानुसार कारवाई करणे
१०. मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ मधील तरतुदींनुसार मोटार वाहन कर व पर्यावरण कराची आकारणी करणे, कर स्विकारणे व थकीत कर वसुली करणे इत्यादी कामकाज
११. मुंबई मोटार वाहन कर (प्रवासी कर) अधिनियम, १९५८ मधील तरतुदींनुसार प्रवासी कराची आकारणी करणे, कर गोळा करणे व वसुली करणे इत्यादी कामकाज